जा.क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/ ५१५१ /२०२४
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक:- 31 JUL 2024

# जाहिरात

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत १५ वा वित्त आयोग अंतर्गत " नागरी आयुष्मान आरोग्य (मंदीर) केंद्रासाठी " खालील पदे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवाराकडुन खालील वेळापत्रकानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारणकरणा-या उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह नियोजित दिनांकास परिपूर्ण अर्ज सादर करावा.

<table>
<tr><th colspan="2">वेळापत्रक</th></tr>
<tr><th>कंत्राटी करार तत्वारील पदांचे नाव</th><th>दिनांक व वेळ व स्थळ</th></tr>
<tr><td>कंत्राटी वैद्यकीय अधिकारी- २०<br>(सदर पदांना मुलाखत घेण्यात येईल.)</td><td>थेट मुलाखत दिनांक --13-- .०८.२०२४ (--मंगळवार--वार)<br>वेळ- सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत<br>स्थळ / ठिकाण :- शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, नांदेड</td></tr>
<tr><td>कंत्राटी स्टाफनर्स-२०<br>(सदर पदांना मुलाखत घेण्यात येणार नाही.)</td><td rowspan="2">अर्ज स्विकारणेची मुदत दि. ०१ .०८.२०२४ ते दि. १६.०८.२०२४ पर्यंत<br>वेळ- सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्विकारण्यात येतील.<br>अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- प्रशिक्षण हॉल, मनपा दवाखाना, जंगमवाडी, लॉयन्स क्लब डोळयाचा दवाखानाच्या पाठीमागे, जंगमवाडी नांदेड. पिनकोड - ४३१६०२</td></tr>
<tr><td>कंत्राटी एमपीडब्लु (पुरुष)-२४<br>(सदर पदांना मुलाखत घेण्यात येणार नाही.)</td></tr>
</table>

| अ. क्रं. | पदाचे नांव (कंत्राटी पध्दतीने) | योजनेचे नाव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव | उच्चत्तम वयो मर्यादा | प्रवर्गा नुसार आरक्षण | एकत्रित वेतन (प्रतिमहा) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी वैद्यकीय अधिकारी | १५ वा वित्त आयोग | २० | एम.बी.बी.एस. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडील नोंदणी अनिवार्य. | ६१ वर्ष | अनु.जाती-०२<br>अनु.जमाती-०१<br>भज-ब-०१<br>भज-क-०१<br>भज-ड-०१<br>इमाव-०४<br>साशैमाप्र-०३<br>आदुघ-०३<br>खुला-०४ | रु.६०,०००/- |
| २ | कंत्राटी स्टाफनर्स | १५ वा वित्त आयोग | २० | जी.एन.एम./बि.एस.सी.नर्सिंग कोर्स उत्तीर्ण, महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडील नोंदणी अनिवार्य. | ५९ वर्ष | अनु.जाती-०२<br>अनु.जमाती-०१<br>भज-ब-०१<br>भज-क-०१<br>भज-ड-०१<br>इमाव-०४<br>साशैमाप्र-०३<br>आदुघ-०३<br>खुला-०४ | रु.२०,०००/ |

01.08.24

CS CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कंत्राटी एमपीडब्लु (पुरुष) | १५ वा वित्त आयोग | २४ | 12th Pass in Science + Paramedical basic Training Course OR Sanitary Inspector Course | खुला प्रवर्ग - ३८ वर्ष तरोच राखीव ४३ वर्षापर्यंत | अनु.जाती-०४<br>अनु.जमाती-०१<br>भज-ब-०१<br>भज-क-०१<br>भज-ड-०१<br>इमाव-०५<br>साशैमाप्र-०३<br>आदुघ-०३<br>खुला-०५ | रु.१८,०००/- |

अटी व शर्ती :-

1. सदर पदाची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन २९ जुन २०२५ पर्यंतच्या कालावधीकरीताच असेल. सदर पदावरील नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने, शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत.
२. केंद्र / राज्य शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.
3. **थेट मुलाखती :- कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदांसाठीच थेट मुलाखत आयोजित करण्यात येईल. या करीता खालील गुणांकन पध्दत अवलंबिण्यात यईल.**
   1) Subject Knowledge (10 Mark)
   2) Research & Academic Knowledge (10 Mark)
   3) Leadership Quality (10 Mark)
   4) Administrative Abilities (10 Mark)
   5) Experience (10 Mark)
      A) For Government Experience 02 marks for 01 Year
      B) For Private Experience 01 marks for 01 Year

   Total Experience – 10 Marks maximum.

एकुण गुण-५०

४. **शैक्षणिक अर्हतेची गुणांकन पध्दती :- कंत्राटी स्टाफ नर्स व एमपीडब्लु पदांसाठी मुलाखत न घेता उमेदवारांची नियुक्ती ही खालील प्रमाणे गुणांकन पध्दतीनुसार निवड करण्यात येईल.**
   १. पदाच्या मुळ शैक्षणिक अर्हतेच्या (Basic Qualification) च्या अंतिम वर्षाच्या मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढण्यात येणार आहे.(उदा. ६०% गुण असल्यास त्याचे ५० टक्के प्रमाणे Proportion = ६० * ५० /१००=30)
   २. पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा संबंधित विषयामध्ये अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास अंतिम वर्षाच्या २० प्रमाणे Proportion काढण्यात येणार आहे.(उदा. ६०% गुण असल्यास त्याचे २० टक्के प्रमाणे Proportion = ६० * २० /१००=१२)

   कंत्राटी स्टाफनर्स व एम.पी.डब्लयु या पदाकरीता अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. कंत्राटी स्टाफ नर्स व एमपीडब्लु पदाची निगडीत अनुभव प्रत्येक एक वर्षासाठी ०६ गुण देण्यात येतील. (जास्तीत जास्त ३० गुणापर्यंत) व त्यानुसार उमेदवाराची गुणवत्ता यादी करुन निवड करण्यात येईल. याची उमेदवाराने नोंद घ्यावी. अनुभवाच्या गुणाकरीता उमेदवारांना अनुभव प्रमाणपत्रासोबत त्यांच्या प्रथम नियुक्तीचे आदेशाची व सध्याचे पुर्नरनियुक्ती आदेशाची छायांकीत प्रत सादर करणे बंधनकारक आहे. उक्त नमूद अटी व्यतिरीक्त अनुभव प्रमाणपत्र सादर केल्यास अनुभवाचे गुण देय राहाणार नाही.

CS CamScanner

३. तसेच कंत्राटी स्टाफ नर्स व एमपीडब्लु करिता सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये विसंगती आढळल्यास जसे की, अनुभव प्रमाणपत्र शैक्षणिक अर्हतेच्या आगोदरचे असणे, नियुक्ती आदेश दिनांक व अनुभव प्रमाणपत्र दिनांक यामध्ये तफावत आढळल्यास अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच कंत्राटी स्टाफ नर्स व एमपीडब्लु पदाकरीता आऊटसोर्स पध्दतीने केल्याचा अनुभव ग्राहय धरता येणार नाही. शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत उमेदवाराने सादर केलेले अनुभव प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येईल. तसेच भविष्यात याबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उदभल्यास तो उमेदवार अपात्र ठरुन नियुक्ती संपुष्टात येईल.

५. एमपीडब्लु पदाबाबत विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषीत केलेली इतर कोणतीही परिक्षा उतिर्ण केलेली आहेत. आणि विभागाच्या आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था, नागपुर यांचेकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकीय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुंटूब कल्याण मंत्रालयांने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरीक्षक (सँनेटरी इनेस्पेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर सुचनाचे काटेकोर पालन करण्याबाबत सुचना आहेत.

६. एमपीडब्लु पदाकरीता अर्ज केलेल्या सर्व उमेदवाराचे सॅनिटरी इंन्स्पॅक्टर प्रमाणपत्र शासनाच्या www. dvet.gov.in या संकेस्थळावर दिलेल्या यादीमध्ये नाव तपासुन खात्री करुन अर्ज दाखल करावा तसेच ज्या संस्थेचे नाव सदर यादीमध्ये नाहीत अशा प्रमाणपत्राच्या बाबतीत संबंधित उमेदवारांनी संस्थेस शासनाने दिलेल्या मान्यतेचे कागदपत्र अर्जासोबत सादर करावे लागेल. संस्था शासन मान्यताप्राप्त नसल्यास उमेदवाराने सादर केलेले प्रमाणपत्र ग्राह्य न धरता संबंधिताचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७. गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारस प्राधाण्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधाण्य देण्यात येईल.

८. कंत्राटी स्टाफनर्स व एमपीडब्लु पदासाठीचे अर्ज हे बंद लिफापामध्येच उक्त दर्शविलेल्या दिनांक व कार्यालयीन वेळेत(सुट्टीचे दिवस वगळुन) स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवाराने अर्ज भरताना परिपुर्ण अर्ज काळजीपुर्व भरुन आवश्यक त्या सर्व शैक्षणिक व अन्य आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती स्वंय साक्षांकीत करुन बंद लिफाप्यात अर्ज सादर करावा. ई-मेलद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदाकरीता थेट मुलाखतीच्या दिवशी उमदेवाराने अर्ज व त्यासोबत आवश्यक सर्व कागदपत्रांच्या छायांकीतप्रतीचा एक संच व मुळ कागदपत्रासह थेट मुलाखतीसाठी उपस्थीत राहावे.

९. वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन त्याचा कालावधी हा दिनांक २९ जुन २०२५ पर्यंत असेल. व सदर पदे १५ वित्त आयोग-NUHM PIP च्या अधिन राहुन तसेच संबंधिताचे कामाचे मुल्यांकन अहवालानुसार व आवश्यकतेनुसार मुदतवाढ देय राहील. PIP मध्ये सदरील पदे कमी झाल्यास आपली नियुक्ती आपोअपच संपुष्टात येईल.

१०. वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडुन शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या दिवशी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निवड झाल्यानंतर सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुनर्रनियुक्ती आदेश देण्यात येतील.

११. उपरोक्त संबंधित पदाकरीता तत्सम काऊंसीलचे रजिस्टेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

CS CamScanner

१२. सर्व पदांसाठी उमेदवाराने विहीत नमुण्यातील अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो (दोन), शैक्षणिक अर्हतेची १० वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र), १२ वी (गुणपत्रक / प्रमाणपत्र), पदवी / पदविकांचे सर्व गुणपत्रक (पहीले वर्ष ते अंतीम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय व अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन (१० वी व १२ वी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्र अर्जासोबत झेरॉक्त प्रतीत ( साक्षांकीत / स्वंय साक्षांकीत) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज् अफेडेव्हीट जोडणे आवश्यक राहील. उमेदवाराने कोणत्याही प्रकारचे खोटे अथवा बोगस कागदपत्र सादर केल्याचे आढळल्यास संबधीताची नियुक्त कुठल्याही टप्पावर रद्द करण्यात येईल.

१३. उमेदवार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

१४. उमेदवारांची अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जात स्पष्टपणे नमुद करावा.

१५. अर्ज सादर करणेकामी व जाहीरातीत नमुद मुलाखतीकरीताच्या पदाकरीता कोणताही प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.

१६. शासकीय सेवेतून सेवानिवृती/स्वच्छा सेवानिवृती कर्मचारी अर्ज करत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झाल्याचा, दिनांक, कार्यकाळ, पदनाम, सेवानिवृती झालेले वर्ष, सेवानिवृतीच्या दिनांक मिळालेले अंतिम वेतन व सेवानिवृतीनंतर देय असलेल वेतन (पेन्शन) आणि यापुर्वी कंत्राटी पध्दतीने कोणत्याही कार्यक्रमास काम केलेले असल्यास त्यांची माहीती अर्जामध्ये नमुद करावी. आणि त्यांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात.

१७. सेवानिवृत कर्मचा-यांची निवड झाल्यास त्यांचे मानधन राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शन सुचनेनुसार मोजमाप करुन आदा करण्यात येईल.

१८. सेवानिवृत कर्मचा-यांची निवड झाल्यास त्यांच्या सेवाकाळामध्ये अथवा सेवानिवृतीनंतर कोणत्याही स्वरुपात चौकशी अथवा प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता मा. आरोग्य सेवा मुंबई, यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांस नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येतील. तसेच रुजु होण्याकरिता त्यांना जिल्हा शल्यचिकीत्सक जिल्हा रुग्णालय नांदेड यांचे शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१९. भरती प्रक्रीया स्थगीत करणे / रद्द करणे / पद भरतीत बदल करण्याचे सर्व अधिकार तसेच रिक्त पदाच्या संख्येत / सामाजिक आरक्षण / पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रीयेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवले आहेत.

२०. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२१. जाहीरातीसह अर्जाचा नमुना हा www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असुन, त्याप्रमाणेच विहीत नमुण्यात अर्ज सादर करावा. अन्यथा उमेदवाराचा अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२२. मुलाखती नंतर निवड झालेल्या उमेदवारांना करार पत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

२३. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसामध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

२४. सदरील पदे १५ व्या वित्तआयोगा अंतर्गत / संबंधित योजने अंतर्गत राहतील. त्याचा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. वरील सर्व पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे भविष्यात कायम सेवेचा लाभ देता येणार नाही.

CS CamScanner

२५. उमेदवारांची पात्र / अपात्र तसेच अंतिम निवड यादी व भरती प्रक्रीये संबंधित आवश्यक सुचना इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवळी महानगरपालिकेच्या नोटिस बोर्ड व वेबसाईट www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अपात्र उमेदवारांना त्यांचे हरकती व सुचना लेखी स्वरुपात संकेतस्थळावर पात्र / अपात्र यादी प्रसिध्द झाल्याच्या ०३ दिवसाचे कार्यालयीन वेळेत आक्षेपासोबत त्याच्या पुष्टीर्थ योग्य पुरावे असल्यास सदर बाब विचाराधीन राहील. तदनंतर येणा-या कुठल्याही आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

२६. उमेदवारांची निवड पुर्ण करण्याआधी उमेदवारांना बोलावुन त्यांचे अर्जाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सदर मुळ (Original) कागदपत्र पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारस निवडप्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

२७. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी व राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस रद्द करण्यात येईल. उमेदवार अथवा नातलगाने निवड प्रक्रीयेमध्ये कुठल्याही प्रकारचा अनावश्यक हस्तक्षेप केल्याचे निदर्शणास आल्यास उमदेवारास अपात्र करण्यात येईल.

२८. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवारांने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे/ दिशाभूल केल्याचे अथवा कोणत्याही प्रकारची माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी/निवड /नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात/संपूष्टात आणण्यात येईल.

२९. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अपात्र / अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकरचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३०. सदर अर्ज स्विकारला म्हणजे नौकरीसाठी निवड झाली असे नाही. सदर निवड प्रक्रिया नव्याने सुरु होत असलेल्या १५ व्या वित्त आयोग अंतर्गत आयुष्मान आरोग्य मंदीर केंद्राकरिता असुन, आरोग्य केंद्राची पुर्णत: निर्मीती झाल्यानंतर निवड यादीतील गुणानुक्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील.

३१. सदर निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादीमधील उमेदवारास नविन भरती न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

३२. अर्जदारांनी आपल्या अर्जावर सद्या सुरु असलेला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत व भरती प्रक्रिया निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासुन ते ०१ वर्षापर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

३३. महाराष्ट्र शासन नागरी सेवा (लहान कुटुंबाबातचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ अन्वये विहीत उमेदवारांनी त्यांचे दि.२८.०३.२००५ अन्वये रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहीत नमुन्यात प्रतीज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

सही/-
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

प्रतिलिपी,

१) सिस्टम मॅनेजर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी सदर जाहीरात सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुण्यासह संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

२) जनसंपर्क विभाग, मनपा नांदेड यांनी सदर जाहीरात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

CamScanner

प्रति,
मा. आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

Photo

**विषय :- .............................. या पदासाठी अर्ज सादर करण्या बाबत.**
संदर्भ :- दैनिक...........................वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात.

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने मी,.........................................या पदासाठी अर्ज करीत आहे. व त्यांची आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

1. उमेदवाराचे नाव : (मराठी मध्ये- अडनाव प्रथम) ......................................................................
2. उमेदवाराचे नांव (SURNAME FIRST- IN ENGLISH CAPITAL LETTER) ..............................
   ..........................................................................................................................
3. जात .................................. प्रवर्ग .............................
4. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता रा. ........................................................... ता. ................
   जिल्हा. ................ ..................पिन कोड क्र. .......................
   मोबाईल क्र.१) ................................ २) ............................................... ई-मेल................
5. कायमचा संपुर्ण पत्ता रा. .................................................... ता. .........................................
6. जिल्हा. ................ ..................पिन कोड क्र. .......................
   मोबाईल क्र.१) ................................ २) ............................................... ई-मेल................
7. जन्म तारीख (अंकात) दिनांक .......... महिना .............. वर्ष .................................
8. जाहिरातीच्या दिनांकास वय वर्ष .............. महिना ........... दिवस ............................
9. राष्ट्रीयत्व ..........................................................
10. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय / नाही.
11. जात वैधता प्रमाणपत्र आहे काय ? होय / नाही. / लागु नाही.
12. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये ( ) अशी खुण करावी.

| अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ. दु.घ | सा.शै.मा.प्र | खु ला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

१२. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता / उत्तीर्ण केलेली परीक्षा | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठ | प्राप्त गुण | किती पैकी | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |

13. तांत्रीक व इतर अर्हतेचा तपशील.

| अ.क्र. | तांत्रीक व इतर अर्हता | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठ | अंतीम वर्षात प्राप्त गुण | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

१४. शासकिय/निमशासकिय कार्यालय/स्था.स्व.सं./NHM कडील अनुभव:- होय / नाही
(असल्यास किती वर्षाचा व कोणत्या कार्यालयाचा आहे. ते खालील प्रमाणे नमुद करावे.)

| अ. क्र. | धारण केलेले पद | काम केलेल्या कार्यालय / संस्थेचे नाव व पत्ता | काम केलेल्या कालावधीची दिनांक नमुद करावी | | एकुण वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महीने | दिवस |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |

मी असे प्रमाणित करतो / करते की, मला जाहिराती मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :-
ठिकाण :-

उमेदवारांची स्वाक्षरी

संपूर्ण नांव-----------------------------------
राहणार.----------------------------------------
ता. ............................जिल्हा. ---------------
मो.क्र. ----------------------------------------

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र)**
**नियम २००५ मधील प्रतिज्ञाप्रत्राचा**
**नमुना – अ**

मी श्री / श्रीमती ........................................................ ..............................................
श्री...................................... यांचा/यांची/मुलगा/ मुलगी/ पत्नी वय.........वर्ष, राहणार ..........................
याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1) मी .......................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2) आज रोजी मला............इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या,.................................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)
3) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-
ठिकाण :-

उमेदवाराची स्वाक्षरी

नांव.................................................
राहणार..............................................
ता...........................जिल्हा..............
मो.क्र................................................